कोल्हापूर म्युनिसिपल कार्पोरेशन एअर रायफल ट्रेनिंग सेंटर

नेमबाजी प्रशिक्षक व मदतनीस पाहिजे

जाहीर प्रसिध्दीकरण

महापालिकेच्या दुधाळी येथील शुटींग रेंजवर नेमबाजीचे प्रशिक्षण देण्यासाठी मानधनावर (दरमहा रु.१०,०००/-) प्रशिक्षक पाहिजे आहे. इच्छुकांनी पात्रता, अनुभव (कमीत कमी पाच वर्षे) इत्यादी माहितीसह बुधवार दिनांक १६/०२/२०२२ रोजी सकाळी ११.०० वाजता ताराबाई पार्क, निवडणूक कार्यालयामध्ये उपस्थित रहावे. प्रशिक्षकपदासाठी असलेल्या अटी/शर्ती www.kolhapurcorporation.gov.in या संकेतस्थळावर व जनसंपर्क विभागात पहावयास मिळतील.

मा.अतिरिक्त आयुक्त
कोल्हापूर महानगरपालिका

कोल्हापूर म्युनिसिपल कार्पोरेशन एअर रायफल ट्रेनिंग सेंटर

अटी/शर्तींची यादी

१. प्रशिक्षणासाठी आवश्यक प्रमाणपत्रे

a) प्रशिक्षकाचे आंतरराष्ट्रीय नेमबाजी क्रीडा महासंघाचे प्रमाणित केलेले नेमबाजी क्रीडा प्रशिक्षक प्रमाणपत्र आवश्यक.

वरील पात्र उमेदवार न मिळालेस

b) नॅशनल मेडलिस्टला प्राधान्य देण्यात येईल.

वरील पात्र उमेदवार न मिळालेस

c) नॅशनल स्पर्धेत सहभाग असलेस प्राधान्य देण्यात येईल.

२. प्रशिक्षकाचे आंतराष्ट्रीय रायफल शूटर प्रमाणपत्र.

३. अधिकृत राष्ट्रीय/आंतरराष्ट्रीय स्पर्धेमध्ये सहभाग किंवा पदक आवश्यक.

४. प्रशिक्षक पदाचा कमीत कमी पाच वर्षे अनुभव पाहिजे.

५. दरमहा किती विद्यार्थी प्रशिक्षणास आले याची नोंद ठेवणे आवश्यक व सचिव व जनसंपर्क अधिकारी यांना त्याची १५ दिवसातून माहिती देणेची आहे.

६. नेमबाजीचे प्रशिक्षक पद सोडताना किमान ३ महिने आधी लेखी कळवणे आवश्यक.

७. रेंजवरील सर्व साहित्याची व सुरक्षिततेची जबाबदारी प्रशिक्षकाची राहील.

८. प्रशिक्षकाने स्पर्धेसाठी बाहेरगावी जाताना त्या कालावधीत आपला जबाबदार प्रतिनिधी नियुक्त करणेचा आहे. त्याची सर्वस्वी जबाबदारी प्रशिक्षकाची राहील.

९. प्रशिक्षकाचे वय १८ ते ५८ या दरम्यान असावे परंतू वय वर्ष ४० पर्यंत असणाऱ्यांना अधिक प्राधान्य देण्यात येईल.

१०. प्रशिक्षण सकाळी ४ तास व सध्याकाळी ४ तास आवश्यता भासल्यास संपूर्ण दिवस दयावे लागेल.

११. शहरातील व जिल्ह्यातील प्रशिक्षकास प्राधान्य देण्यात येईल.

वरील सर्व अटी/शर्ती मला/आम्हास मान्य आहेत.

अर्जदाराचे नांव/सही